**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई यांचे कार्यालय.**

धर्मादाय आयुक्त भवन
सास्मिरा इमारत, दुसरा मजला, सास्मिरा मार्ग,
वरळी, मुंबई 400030
दूरध्वनी क्रमांक :२४९३५४३४, २४९३५४९०
Website: www.charity.maharashtra.gov.in

Office of the CHARITY COMMISSIONER
Sasmira Building, 2nd Floor,Sasmira Marg,
Worli, Mumbai 400030.
Tel No : २४९३५४३४, २४९३५४९०
E-mail ID: supdtest.mum-mh@gov.in

जा. क्र./ आस्था/निरी -१ /सरळसेवा/2880 / २०२६ दि. 04 JUN 2026

# सूचना

धर्मादाय संघटनेच्या आस्थापनेवरील गट-ब(अराजपत्रीत) व गट-क संवर्गातील विविध पदभरतीकरीता दि.०९/०९/२०२५ रोजी सविस्तर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर जाहिरातीतील लघुलेखक (उच्च श्रेणी) व लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) या पदांकरीता व्यावसायीक चाचणी परीक्षेकरीता भाषेची निवड अनिवार्य आहे.

लघुलेखक (उच्च श्रेणी) व लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील व्यावसायीक चाचणीसाठी दि. ०१ एप्रिल, २०२६ रोजी घोषणापत्राने पात्र ठरविलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी लघुलेखनाची मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेची निवड केलेली आहे अशा उमेदवारांना सुचीत करण्यात येते की, धर्मादाय संघटनेच्या अधिकृत संकेतस्थळ www.charity.maharashtra.gov.in वर दिलेल्या लिंकवर भाषेची निवड करण्याची सूविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर लिंकवर ज्या उमेदवारांनी जाहिरातीच्या अनुषंगाने सादर केलेल्या अर्जामध्ये इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेची निवड केली आहे अशा उमेदवारांनी व्यावसायीक चाचणीकरीता इंग्रजी किंवा मराठी यापैकी एका भाषेची निवड करावी, जे उमेदवार सदर लिंकद्वारे व्यावसायीक चाचणीसाठी भाषेची निवड करणार नाहीत त्यांचे बाबतीत निवड समिती ठरविल त्याचभाषेमध्ये व्यावसायीक चाचणी देणे बंधनकारक राहील. सदरील संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या लिंक वर भाषा निवडण्याची सुविधा दि.०५/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० ते दि. १४/०६/२०२६

रोजी रात्री २३.५९ मिनिटापर्यंत उपलब्ध राहील.

उक्त कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक चाचणीचे वेळापत्रक व ठिकाण दि. ०१ एप्रिल, २०२६ रोजी घोषणापत्राने पात्र ठरविलेल्या उमेदवारांना त्यांचे मेल द्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल, तसेच धर्मादाय संघटनेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

०५/०६/२६.
(अमोघ श्या. कलोती)
अध्यक्ष, राज्य स्तरीय निवड समिती
तथा धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.